## ( महाराष्ट्र पोलीस राजपत्र, विभागीय भाग ६ अ करिता )

क्र: पोमसं /८अ/नि.सू -२०१६-१७(प्र.लि. ते का.अ.)/मफुसल/ २२६/२०१६ मुंबई , दिनांक : १९/०५/२०१७

## -: आदेश :-

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मुफसल लिपीक संवर्गातील खालील नमूद प्रमुख लिपीकांना (राजपत्रित / अराजपत्रित गट क ) यांना कार्यालय अधीक्षक (राजपत्रित / अराजपत्रित गट ब ) या पदावर कार्यभार स्विकारल्याच्या दिनांकापासून पदोन्नती देण्यात येत असून पदोन्नतीवर त्यांची नियुक्ती त्यांच्या नावांसमोर दर्शविलेल्या कार्यालयामध्ये करण्यात येत आहे :-

| अ.क्र. | प्रमुख लिपीकांचे नाव | सध्याच्या नियुक्तीचे कार्यालय | पदोन्नतीवरील नवीन नेमणूकीचे कार्यालय | अभिप्राय |
|---|---|---|---|---|
| १ | श्रीमती विद्याश्री विजय खाडे | विपोमनि, रारापोबल, पुणे | समादेशक, रारापोबल, गट क्र १३, नागपूर | रिक्त पदात |
| २ | श्रीमती परवीन सादिक हुसेन | विपोमनि, नागपूर परिक्षेत्र | विपोमनि, नविअ, नागपूर | रिक्त पदात |
| ३ | श्री नरेंद्र रामराव जगताप | विपोमनि, अमरावती परिक्षेत्र | विपोमनि, रारापोबल, पुणे | श्रीमती शिंदे यांच्या पदोन्नतीने रिक्त होणाऱ्या पदात |
| ४ | श्री विलास मारोतराव चौदंते | विपोमनि, औरंगाबाद परिक्षेत्र | समादेशक, रारापोबल, गट क्र १२, हिंगोली | श्री अंबेकर यांचे बदलीने रिक्त होणाऱ्या पदात |
| ५ | श्री राजु हरीभाऊ कोठे | समादेशक, रारापोबल, गट क्र १३ नागपूर | विपोमनि, रारापोबल, नागपूर | दि. ३१/०५/२०१७ रोजी सेवानिवृत्तीने रिक्त होणाऱ्या पदात |
| ६ | श्री किशोर रुपराव उंबरकर | विपोमनि, रारापोबल, नागपूर | समादेशक, रारापोबल, गट क्र ७, दौंड | श्री भुरकूड यांचे बदलीने रिक्त होणाऱ्या पदात |

**सतीश माथुर**
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई .

प्रति,

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे / नागपूर.
विशेष पोलीस महानिरीक्षक, नागपूर परिक्षेत्र / अमरावती परिक्षेत्र / औरंगाबाद परिक्षेत्र
विशेष पोलीस महानिरीक्षक, नक्षल विरोधी अभियान, नागपूर
समादेशक, राज्य राखीव पोलीस बल गट क्र. ७, दौंड /गट क्र १२, हिंगोली /गट क्र १३, नागपूर

२. उपरोक्त प्रमुख लिपीक यांना आता निलंबित केले असेल, किंवा त्यांच्याविरुध्द नव्याने विभागीय चौकशी प्रलंबित असेल, किंवा न्यायालयात खटला चालू असेल, किंवा न्यायालयाने दिलेल्या निर्णयांविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपिल प्रलंबित असेल, किंवा जर ते एखादी शिक्षा भोगत असतील तर घटक प्रमुखांना विनंती करण्यात येते की, त्यांनी त्यांना पदोन्नतीवर न सोडता सविस्तर अहवाल पोलीस महासंचालक कार्यालयास पाठवावा व पुढील आदेशांची वाट पाहावी.

३. उपरोक्त प्रमुख लिपीकांविरुध्द वरीलप्रमाणे काहीच कार्यवाही प्रलंबित नसेल तर त्यांना **पर्यायी प्रमुख लिपीकाची वाट न पाहता** पदोन्नतीवर नवीन नियुक्तीचे ठिकाणी तात्काळ कार्यमुक्त करावे. तसेच त्यांना कार्यमुक्त केल्याचा व पदोन्नतीच्या ठिकाणी हजर झाल्याचा दिनांक सत्वर ह्या कार्यालयास कळवावा.

४. घटक प्रमुखांनी संबंधित प्रमुख लिपीकांना विनाविलंब कार्यमुक्त न केल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी संबंधित घटक प्रमुखांची राहील.

५. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक पीअेच्वाय् /१०८२/सीआर/११००(२)/अेस्ईआर् -३, दिनांक ०६.११.१९८४ अन्वये पदोन्नतीनंतर कनिष्ठ पदावर वेतनवाढ दिल्यानंतर वेतननिश्चिती करण्याबाबत विकल्प द्यावयाचा असेल, तर तो पदोन्नतीवर हजर झालेल्या दिनांकापासून १ महिन्याचे आंत द्यावा. अशा प्रकारचा विकल्प न दिल्यास पदोन्नत पदावरील वेतननिश्चिती म.ना.सेवा (वेतन) नियम, ११(१)(अ) अन्वये केली जाईल याची उपरोक्त प्रमुख लिपीकांनी नोंद घ्यावी.

६. सदरहू आदेश मा.उच्च न्यायालयात प्रलंबित असलेल्या मूळ याचिका क्रमांक २७९७/२०१५ वरील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

७. उपरोक्त प्रमुख लिपीक हे पदोन्नतीवर जाण्यास इच्छुक नसतील तर त्यांनी तसा **अर्ज ७ दिवसांचे आत** घटक प्रमुखांचे मार्फत ह्या कार्यालयास सादर करावा. तसा अर्ज त्यांनी सादर न केल्यास घटक प्रमुखांनी त्यांना **दिनांक २२/०५/२०१७ रोजी** न चुकता कार्यमुक्त करावे व अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

८. पदोन्नती आदेशानंतर जे प्रमुख लिपीक रुग्ण निवेदन करतील अथवा गैरहजर राहतील त्यांना रुग्ण निवेदनाच्या तारखेपासून स्थित कार्यमुक्त (Stand relieved) करण्यात यावे, व त्यांना कार्यमुक्त केल्याचा आदेश त्यांच्या निवासस्थानी बजावावा.

प्रत,

अपर पोलीस महासंचालक, राज्य राखीव पोलीस बल, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, विशेष कृती दल, म.रा., मुंबई.
कार्यासन अधिकारी, कार्यासन क्रमांक १० / १२
पोलीस उप अधीक्षक, संगणक कक्ष.

२. सदरचे आदेश कृपया पोलीस महासंचालकांच्या संकेतस्थळावर एक महिन्यासाठी उपलब्ध करुन देण्यात यावेत.

(अनुपकुमार सिंह)
विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)
पोलीस महासंचालक यांचेकरीता.